**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराच्या  वाटाघाटी पूर्ण
- महाराष्ट्राचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती
- छत्तीसगढच्या सुकमा जिल्ह्यात नक्षल्यांचा हत्यारांचा कारखाना उद्ध्वस्त/ मोठा शस्त्रात्र साठा जप्त

**आणि**

- बांगलादेशातल्या निवडणुकांमधे अवामी लीगवर बंदी घालण्याच्या निर्णयावर बांगलादेशच्या पदच्युत प्रधानमंत्री शेख हसीना यांची टीका

**<><><><><>**

भारत- न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी आज दूरध्वनीवरुन चर्चा केल्यानंतर ही घोषणा केली. येत्या ३ महिन्यात त्यावर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे. ऐकूया या कराराबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून

**.....व्हॉईस कास्ट. अंकिता**

*(न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन गेल्या मार्चमधे भारतभेटीवर आले असताना उभय राष्ट्रात मुक्त व्यापार कराराबद्दलची बोलणी सुरु झाली होता. विक्रमी वेळात ती पूर्ण झाली आहेत.  या करारानुसार भारतातून न्यूझीलंडमधे निर्यात होणाऱ्या मालावर मोठ्या सवलती मिळणार असून भारतात नयूझीलंडमधून येणाऱ्या मालावरच्या शुल्कात  ७० टक्के सवलत असेल.व्हिसाचे नियम अधिक सुटसुटीत होतील,  दोन्ही देशात शेती, लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योग, शिक्षण  इत्यादी क्षेत्रांमधे व्यापाराच्या संधी वाढतील आणि   पुढच्या ५ वर्षात परस्पर व्यापार दुप्पट होईल असा विश्वास दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला. या करारानुसार पुढच्या १५ वर्षांत न्यूझीलंडकडून भारतात सुमारे २० अब्ज डॉलर्स गुंतवणूक होईल अशी अपेक्षा आहे. मात्र न्यूझीलंडच्या दूध आणि दुधाच्या पदार्थांवर कोणतीही सवलत दिली जाणार नाही असं अधिकृत सूत्रांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

न्यूझीलंडबरोबरचा मुक्त व्यापार करार हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातल्या भारताच्या भूमिकेला पोषक ठरेल असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. विविध देशांबरोबर परस्परपूरक संबंध वेगाने दृढ होत असल्याचं या करारावरुन दिसतं असं ते आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत म्हणाले....

**होल्ड बाईट- गोयल**

भारताचं आंतरराष्ट्रीय व्यापारातलं वाढतं वर्चस्वही या करारामुळे स्पष्ट होतं असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय महिला आयोगाने तरुण संशोधकांसाठी शक्ती पाठ्यवृत्तीची घोषणा केली आहे. महिलांच्या प्रश्नांशी संबंधित धोरणांमध्ये सकारात्मक बदल घडवण्याच्या दृष्टीने संशोधन करू इच्छिणाऱ्या २१ ते ३० वर्षे वयोगटातल्या भारतीय नागरिकांना ही पाठ्यवृत्ती दिली जाईल. ही पाठ्यवृत्ती सहा महिन्यांसाठी असून त्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत आवेदन करता येईल, असं आयोगाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठाने महाराष्ट्र सरकारला नोटीसही बजावली आहे. विधानसभेच्या सदस्यत्वाचा निर्णय येईपर्यंतच ही स्थगिती राहणार असून कोकाटे यांना कोणतंही लाभाचं पद स्वीकारण्यावर बंदी घालण्यात आल्याचं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. १९९५च्या सरकारी गृहनिर्माण योजनेशी संबंधित फसवणुकी प्रकरणी कोकाटे यांना दोषी मानून

दंडाधिकाऱ्यांनी दिलेली दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा नाशिक सत्र न्यायालयाने गेल्या मंगळवारी कायम ठेवली होती. प्रथमदर्शनी पुराव्यांवरून या प्रकरणात कोकाटे यांचा सहभाग असल्याचं आढळल्यामुळे उच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती द्यायला नकार दिला होता.

<><><><><>

भारताचे थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंती निमित्त आज राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात येत आहे. शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि अकादमिक मंचांवर गणिताचे वैज्ञानिक प्रगती आणि दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. रामानुजन यांच्या सन्मानार्थ सरकारने २०११ मध्ये २२ डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २०१२ हे वर्ष देशात राष्ट्रीय गणित वर्ष म्हणून साजरे करण्यात आले.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांचे निकाल काल जाहीर झाले.

या निवडणुकीत भाजपा ११७ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला एकनाथ शिंदे यांच्यानेतृत्वात शिवसेना पक्षानं ५३, आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं ३७ जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसला २८, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ९ जागा मिळाल्या तर अपक्ष आणि इतरांना ३७ जागा मिळाल्या आहेत. महाराष्ट्र विकासाच्या बाजूने खंबीरपणे उभा असल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत महायुतीच्या विजयाबद्दल अभिनंदन करत जनतेचे आभार मानले.

तीन नगराध्यक्ष पदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाल्या होत्या. या निवडणुकीत स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वेगवेगळ्या तडजोडी झाल्या होत्या तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या.

<><><><><>

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सशस्त्रदलांनी काल मोठी कारवाई करून नक्षलवाद्यांचा एक शस्त्रास्त्रांचा कारखाना उद्‌ध्वस्त केला. या कारवाईदरम्यान ८ सिंगल शॉट रायफल्स, मोठ्या प्रमाणात स्फोटकं आणि शस्त्रास्त्रं तयार करण्यासाठीची उपकरणं आणि सामान जप्त करण्यात आलं. केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलानं गुप्त माहितीच्या आधारे मीनागट्टा परिसरातलं जंगल आणि डोंगराळ भागात शोधमोहीम राबवली आणि हा कारखाना शोधून उद्‌ध्वस्त केला.

<><><><><>

बांगलादेशात अवामी लीगशिवाय होणारी निवडणूक ही निवडणूक नसून राज्याभिषेक असेल असं बांगलादेशाच्या पदच्युत प्रधानमंत्री शेख हसीना म्हणाल्या आहेत. एका वृत्त संस्थेला त्या मुलाखत देत होत्या. मोहम्मद युनुस हे बांगलादेशी नागरिकांच्या पाठिंब्याशिवाय तिथे सत्ता गाजवत असून, आता ते जनतेनं नऊ वेळा निवडून दिलेल्या पक्षावर बंदी घालण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका शेख हसीना यांनी केली. भारत हा बांगलादेशाचा सर्वात घनिष्ट मित्र आणि भागीदार आहे. मात्र, मोहम्मद युनूस हे बांगलादेशात भारताच्या विरोधात लोकभावना भडकवत आहेत, असं शेख हसीना म्हणाल्या.

बांगलादेशात पुढच्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात निवडणुका होणार असून त्यात अवामी लीग पक्षाला निवडणूक लढवायला बंदी घालण्यात आली आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये, भारतीय संघानं काल रात्री विशाखापट्टणममध्ये झालेल्या पहिल्या T20 आंतरराष्ट्रीय सामन्यात श्रीलंकेला आठ गडी राखून पराभूत करत पाच सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. विजयासाठीचं १२२ धावांचं लक्ष्य भारताने १४ षटक आणि ४ चेंडूत पूर्ण केलं. ४४ चेंडूत ६९धावा करणारी जेमिमा रोड्रिग्ज सामनावीर ठरली.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियात बोंडी इथे झालेल्या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर आज न्यू साउथ वेल्सच्या लोकप्रतिनिधी गृहाने विशेष अधिवेशन बोलावलं आहे. या अधिवेशनात कोणाला किती बंदुका बाळगता येतील या विषयीचे कायदे मंजूर केले जाणार आहेत. त्यानुसार, ऑस्ट्रेलियात प्रत्येक व्यक्तीला चारच बंदुका बाळगण्याची मर्यादा असेल. शेतकऱ्यांसाठी ही मर्यादा १० बंदुकांपर्यंत वाढवण्यात आली आहे. बंदुकांच्या परवान्याचं नूतनीकरण दर दोन वर्षांनी करणं बंधनकारक असेल. तसंच, उच्च क्षमतेच्या मॅगझिन्सवरही बंदी घालण्यात येईल. १४ डिसेंबर रोजी बोंडी किनाऱ्यावर हनुक्का या उत्सवात दोन हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात १५ जण ठार झाले होते.

**<><><><><>**

दिल्लीहून आज पहाटे मुंबईला येणाऱ्या एअरइंडियाच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते माघारी वळवून दिल्ली विमानतळावर उतरवण्यात आलं. विमानातले प्रवासी आणि कर्मचाऱ्यांना सुखरूप उतरवण्यात आल्याची माहिती एअरइंडियाच्या प्रवक्त्यानं दिली आहे. दिल्ली विमानतळावरुन उड्डाण केल्यानंतर थोड्याच वेळात वैमानिकाला इंजिनात बिघाड आढळल्यामुळे एअर इंडियाने पहाटे ६ वाजून ४० मिनिटांनी आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली आणि विमानाला परत बोलावण्यात आलं. सध्या विमानाची सखोल तपासणी सुरु आहे. दरम्यान एअर

इंडियाने या प्रवाशांसाठी उपाहाराची तसेच  दुसऱ्या विमानाने मुंबईकडे पाठवण्याची व्यवस्था केल्याचं प्रवक्त्याने सांगितलं.

नागरी वाहतुक मंत्रालयाने या प्रकरणाची सखोल चौकशी करायचे आदेश नागरी वाहतूक महासंचालनालयाला दिले आहेत.

**<><><><><>**

उत्तराखंड, झारखंड, पंजाब, हरियाणा, बिहार आणि उत्तर प्रदेशात आज थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागात आज रात्री आणि उद्या सकाळी दाट ते अतिदाट धुक्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा,  उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या काही भागांमध्ये आज दाट धुक्याची शक्यता असल्याचं, तर बिहार, झारखंड आणि ओडिशात बुधवारपर्यंत धुक्याची शक्यता असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे.

**//<><><><><>//**